महाराष्ट्र शासन

ईमेल : dadarao.gaikwad@nic.in
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२८८६९३४

क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१३४/जल-१
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ मे, २०१७

प्रति,
जिल्हाधिकारी सर्व
मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व

**विषय :- गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत इंधनाकरिता निधी वितरणाची कार्यपध्दती**

**संदर्भ:- जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक गामुध-२०१७/प्र.क्र. १३४/ जल-१दि. ६ मे, २०१७**

उपरोक्त संदर्भानुसार गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यामध्ये गाळ काढण्याबाबतच्या सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. तथापि क्षेत्रिय स्तरावरुन गाळ काढल्यानंतर शेतकरी / अशासकीय संस्था यांना इंधनापोटी रक्कम कशा प्रकारे अदा करावी याबाबत विचारणा करण्यात येत आहे. इंधनाचा निधी अदा करण्याबाबत एकसूत्रिपणा असावा म्हणून खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) शेतकरी / अशासकीय संस्था यांनी ऑनलाईन / ऑफलाईन अर्ज दाखल केल्यानंतर तहसीलदार यांनी तात्काळ तो अर्ज ज्या तलावातील गाळ काढण्याबाबतचा आहे तेथील उप अभियंता / शाखा अभियंता यांच्याकडे वर्ग करावा. शाखा अभियंता यांनी गाळ काढण्याबाबतच्या शासन निकषानुसार प्रस्तावाची छाननी करुन त्यावर उप अभियंता यांची तांत्रिक मान्यता (Technical Sanction) घेवून तहसीलदार यांचेकडे सादर करावा. तहसीलदार यांनी शिफारशीसह प्रस्ताव उप विभागीय अधिकारी यांचेकडे सादर करावा. दि.६ मे,२०१७ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष हे उप विभागीय अधिकारी असून त्यांनी असे प्रस्ताव तालुकास्तरीय समितीसमोर मान्यतेसाठी ठेवावेत. तालुकास्तरीय समिती निधीच्या उपलब्धतेनुसार प्रथम अर्ज प्रथम मान्यता या निकषानुसार त्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देईल. प्रशासकीय मान्यतेमध्ये शेतकरी / अशासकीय संस्था यांचे नाव नमूद करुन

किती घन मीटर गाळ काढण्यास अनुमती देण्यात आली आहे याबाबतचा स्पष्ट उल्लेख त्यामध्ये करावा. तसेच इंधनासाठी प्रशासकीय मान्यतेमध्ये नमूद केलेल्या गाळाच्या परिमाणा इतकीच इंधनाची देयके अदा करण्यात यावीत. तालुकास्तरीय समितीने प्रशासकीय मान्यता देताना उपलब्ध निधीच्या प्रमाणातच मान्यता द्यावी. जिल्हाधिकारी (जिल्हास्तरीय समिती) यांनी अगोदरच तालुकानिहाय किती निधी उपलब्ध होणार याबाबत तालुकास्तरीय समितीला लेखी कळवावे.

२) गाळ उत्खनन करण्याकरिता जेसीबी व पोकलेन याकरिता प्रति घन मीटर प्रचलित डिझेल दरानुसार किती खर्च येतो याबाबत मुख्य अभियंता (यांत्रिकी),नाशिक यांचेकडून तांत्रिक अहवाल प्राप्त होणार आहे. तो अहवाल प्राप्त होताच प्रति घन मीटर मशिननिहाय किती इंधन लागेल याबाबत माहिती देण्यात येईल. तोपर्यंत शासन परिपत्रक क्र.मफुअ २०१६/प्र.क्र.६८/जल-८, दि.४ मे,२०१६ नुसार का... ही करावी. प्रति घन मीटर इंधनावर जो खर्च येतो त्या खर्चाला जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यात यावी.

३) ज्या तलावाच्या ठिकाणी गाळ काढण्याचे काम सुरु होणार आहे त्या ठिकाणी काम सुरु होण्यापूर्वीचे फोटो काढून १० सेकंदाची व्हीडीओ क्लिप शेतकरी व मशिनरीसह घेण्यात यावी. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर फोटो व १० सेकंदाची व्हीडीओ क्लिप प्रत्यक्ष तलावातील खोदकामाची (Barrow Pit) तसेच शेतकरी व मशिनरीसह घेण्यात यावी. मागणीपत्र ऑनलाईन सादर करणे, जीओ टॅगिंग,युनिक जीओ आयडी याबाबतची कार्यवाहीसुरु असून संगणक आज्ञावली तयार झाल्यानंतर त्यामध्ये ही माहिती अपलोड करावी.

४)गाळ काढण्यापूर्वीचे मोजमाप (Measurement) व पातळी (Level) घेण्यात यावे. तसेच ...ळ काढल्यानंतरचे मोजमाप व पातळी घेण्यात यावी. प्रत्यक्ष मोजमापानुसार किती घन मीटर गाळ काढण्यात आला हे निश्चित करावे. गाळाचे मोजमाप घेण्याकरिता स्वतंत्र मोजवह्या (Measurement Book) ठेवण्यात याव्यात. या मोजवह्यांमध्ये बॅरो पीट मधील प्रत्यक्ष उत्खननाद्वारे किती गाळ काढला याचे मोजमाप घेण्यात यावे व त्यानुसार किती घन मीटर गाळ काढण्यात आला याचे परिमाण (Quantity) निश्चित करावी आणि त्यानुसार इंधनावरील देय रक्कम नोंदवावी.

५)तालुका स्तरावरील समितीने ( उप विभागीय अधिकारी) तालुक्यातील किती तलावांमधील गाळ काढावयाचा याची संख्या निश्चित करुन त्यानुसार अंदाजपत्रके तयार करुन त्यास तांत्रिक मान्यता घेणे, मोजमाप घेणे, देयके सादर करणे याकरिता तलावनिहाय शाखा अभियंता / उप अभियंता यांची नेमणूक करावी व तसे आदेश निर्गमित करावेत.

६) प्रत्येक तलावावर नेमणूक केलेल्या शाखा अभियंता यांनी एक स्वतंत्र नोंदवही ठेवावी. यामध्ये शेतकऱ्यांचे नाव व दररोज त्यांनी किती खेपा (Trip) गाळ वाहून नेला याची नोंद ठेवावी. अशा प्रकारच्या नोंदवह्यांमध्ये नोंदी घेण्याकरिता तलाठी/ ग्रामसेवक किंवा कर्मचारी नेमण्यात यावा. तालुकास्तरावरील समितीने अशा नेमणूक करावयाच्या कर्मचाऱ्यांचे तलावनिहाय आदेश निर्गमित करावेत.गाळ काढण्याचे दैनंदिन नोंदवहीचा नमूना सोबतच्या प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे राहील.

**७) ज्या ठिकाणी शासकीय खर्च होत आहे त्या ठिकाणी वरील नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील.** ज्या ठिकाणी इंधनावर शासन खर्च होत नाही अशा ठिकाणी तलाठी यांनी दैनंदिन किती गाळ काढण्यात आला याचा तपशील शेतक-यांच्या नावासह व काढण्यात आलेल्या गाळाच्या परिमाणासह तहसीलदार यांना सादर करावा.

८) शाखा अभियंता / उप अभियंता यांनी मोजमाप वहीमध्ये नोंदी घेतल्यानंतर तशी देयके तयार करावीत व ती ज्या सक्षम अधिकाऱ्याकडून देयक पास होते अशा अधिकाऱ्याकडे सादर करावीत. सक्षम अधिकाऱ्याने देयके पारीत केल्यानंतर ती तालुकास्तरीय समितीकडे मान्यतेसाठी सादर करावीत तालुकास्तरीय समितीने मान्यता दिल्यानंतर **ग्रामसभेच्या** मान्यतेने संबंधित शेतकऱ्यांस / अशासकीय संस्था / ग्राम पंचायत यांना RTGS किंवा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाद्वारे देयके अदा करण्यात यावीत.

९) जे तलाव जिल्हा परिषदेकडे निहित आहेत त्या तलावा संदर्भात कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (जि.प.) यांनी देयके पास केल्यानंतर अशी देयके तालुकास्तरीय समितीच्या व ग्रामसभेच्या मान्यतेनंतर कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (स्था.स्त.) यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत. कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (स्था.स्त.) यांनी कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (जि.प.) यांच्याकडून प्राप्त झालेल्या देयकानुसार RTGS किंवा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून पेमेंट करावे.

१०) जे तलाव कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (स्था.स्त.) यांच्याकडे आहेत त्या तलावा संदर्भात कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (स्था.स्त.) यांनी देयक पारीत करुन तालुकास्तरीय समिती व ग्रामसभेच्या मान्यतेने संबंधित रक्कम शेतकरी/ ग्रामपंचायत/ अशासकीय संस्था यांना RTGS किंवा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाद्वारे रक्कम अदा करावी.

११) इंधनावरील खर्च कोणास द्यावा याबद्दल सध्या वेगवेगळया जिल्हयांमध्ये वेगवेगळी कार्यपध्दती प्रचलित आहे. काही जिल्हयांमध्ये देयकाची रक्कम पेट्रोलपंप चालकाला इंधनाच्या पावत्यानुसार देण्यात येते तर काही ठिकाणी ही रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येते. या प्रक्रियेमध्ये सुसूत्रता येण्याकरिता खालील प्रक्रियेचा अवलंब करावा :-

अ)ज्या ठिकाणी शेतकरी वैयक्तिक स्वतःच्या खर्चाने JCB / Poclainउपलब्ध करुन देतील त्या ठिकाणी शा

अभियंता यांनी शेतकरीनिहाय Borrow Pit ची आखणी करुन द्यावी व त्यानुसार मोजमाप घ्यावे. एव

तलावावर एकाच वेळी ३-४ शेतकरी गाळ काढीत असल्यास अशा ३-४ ठिकाणी वेगवेगळे Borrow

आखून देण्यात यावेत, जेणे करुन शेतकऱ्यांमध्ये गाळ काढण्यावरुन वाद निर्माण होणार नाहीत. त

मोजमाप घेण्यास सोईस्कर होईल व त्यानुसार शेतकऱ्यांना किती रक्कम देय आहे हे निश्चित क

येईल.देय रक्कम निश्चित करताना खालील ३ बाबी विचारात घ्याव्यात :-

(१) शेतकऱ्याने वाहून नेलेल्या खेपा व त्यानुसार गाळाचे होणारे परिमाण , उदा.एका ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अंदा

२.७५ घन मीटर इतका गाळ येतो. त्याचप्रमाणे इतर वाहनाच्या सुध्दा परिमाण त्यानुसार काढता येईल,

(२)Borrow Pit नुसार घेतलेल्या मोजमापाच्या नोंदी,

(३)डिझेलच्या खर्चाच्या पेट्रोलपंपावरील शेतकऱ्यांच्या नावे असलेल्या पावत्या,

देयके सादर करताना या तीनही बाबींचा उल्लेख त्यामध्ये योग्य त्या कागदपत्रांसह सादर करण्यात य

वरील तीनही बाबींमध्ये देय होणाऱ्या रक्कमेचा तुलनात्मक तक्ता तयार करावा व ज्याबाबी मध्ये कि

खर्च आलेला आहे ती रक्कम शेतकऱ्याला RTGS किंवा इलेक्ट्रॉनिक पेमेंट द्वारे अदा करावी.

ब) ज्या ठिकाणी अशासकीय संस्था / ग्राम पंचायत यांच्या पुढाकाराने JCB / पोकलॅन मशीन्स उप

करुन देण्यात आले आहेत त्या ठिकाणी वरील परिच्छेद "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे orrow Pi

आखणी करुन देण्यात यावी. Borrow Pit मध्ये एकाच वेळेला एक किंवा त्या पेक्षा अधिक JCB / Po

मशीन कार्यरत असू शकतात. तसेच एकापेक्षा अधिक शेतकरी गाळ काढून जावू शकतात. त्यामु

शेतकरी गाळ काढून जात आहेत त्यांच्या नोंदीबद्दल नमूद केलेल्या नोंदवहीमध्ये शेतकरीनिहाय . घे

याव्यात. इंधनाची रक्कम ग्रामपंचायत/शासकीय संस्था यांना देण्यास हरकत नसल्याबाबतचे प्रम

संबंधित शेतकऱ्यांकडून घेण्यात यावे. जेणे करुन भविष्यामध्ये देयकाबाबत वाद होणार नाही. देय

रक्कम निश्चित करताना खालील तीन बाबींचा विचार करण्यात यावा :-

a) शेतकऱ्याने गाळ घेवून गेलेल्या खेपा (वाहनाच्या प्रकारासह) व त्यानुसार येणारे परिमाण (Quantity ),

b) Borrow Pit नुसार काढलेल्या प्रत्यक्ष खोदण्यात आलेल्या गाळाच्या मोजमापाच्या नोंदी,

c) डिझेलच्या खर्चाच्या अशासकीय संस्था / ग्राम पंचायतीच्या नावे दिलेल्या पेट्रोलपंपाच्या पावत्या,

देयके सादर करताना या तीनही बाबींचा कागदपत्रे सादर करावीत व या तीनही बाबींचा तुलनात्मक

तयार करावा व त्यानुसार किमान खर्च असलेली रक्कम RTGS द्वारे अशासकीय संस्था / ग्राम पंचायत

अदा करण्यात यावी.

१२) वरील दोन्ही "अ" व "ब" बाबत देयके अदा करण्यापूर्वी तालुका स्तरावरील समिती व ग्रामसभेची मान्यता घेण्यात यावी. जिल्हा परिषदेकडील तलावातील गाळाच्या इंधनाची देयके अदा करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (जि.प.) यांची राहील. त्यांनी कार्यकारी अभियंता ,लघु पाटबंधारे (जि.प.)यांनी अंतीम देयके पारीत केल्यानंतर ती कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (स्था.स्त.) यांच्याकडे पाठवावी. कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्था.स्त.) यांनी त्यानुसार देयके अदा करावी. तसेच कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (स्था.स्त.) यांचेकडे असलेल्या तलावाच्या देयकाची जबाबदारी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्त.) यांची राहील.

इंधनावरील खर्चाकरिता जलयुक्त शिवार अभियानांतर्गत येणारा निधी वापरण्यात यावा. हा निधी कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे (स्था.स्त.) यांच्या मार्फत वितरीत करण्यात यावा. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही राज्य शासनाची महत्वाकांक्षी योजना असून यामध्ये आपणास यापूर्वी जिल्हानिहाय उद्दीष्ट देण्यात आलेले आहे त्यानुसार उद्दीष्ट पूर्ततेसाठी कार्यवाही करावी. दि.६ मे,२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करण्यात यावे . या कामामध्ये **लोकसहभाग व पारदर्शकता** ही सर्वोच्च प्राथम्याची बाब असून याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

१८/५/१७
एकनाथ डवले
सचिव (जलसंधारण)

प्रत: अधिक्षक अभियंता, जलसंधारण मंडळ, पुणे, ठाणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.